*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---



# UNIT 8

# HEGEL

# हेगेल

**1: केवल चिद्वाद:** केवल चित्‌ची संकल्पना आणि स्वरुप.

**2: विरोधविकासाची संकल्पना:** त्रिस्तरिय प्रक्रिया: त्याचे महत्व, ''वास्तव हेच सत्य''

**3: मनाचे मानसघटनाशास्त्र:** जाणीवेच्या विकासाच्या विविध अवस्था.

---

## प्रस्तावना

**का**न्टनंतर जर्मनीत आणि युरोपात जे महान प्रज्ञावंत आणि प्रतिभावंत तत्वज्ञ होऊन गेले त्यास सर्वात अत्यंत प्रभावी विचारांचा व प्रतिभेचा तत्वज्ञ म्हणून हेगेल (George Wilhelm Friedrich Hegel 1770-1831) या तत्त्ववेत्त्यास स्वत:चे स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे.फिश्ट (J.G.Fichte 1762–1814), शेलिंग (Friedrich von Schelling 1775–1854) यानंतर हेगेलचेच नाव प्रामुख्याने घ्यावयास पाहिजे.या तिघांनी मिळून जर्मन चिद्‌वादाची मांडणी केली.हेगेल हा शेलिंगचा समकालीन व स्नेही होता, परंतु त्यांच्या जीवनाच्या उत्तरार्धात त्यांच्यात मतभेद व दुरावा निर्माण होऊन शेलिंग व हेगेल परस्परांचे टीकाकारही बनले.

*Georg Wilhelm Friedrich Hegel*
*(August 27, 1770 - November 14, 1831)*
*German philosopher,*
*one of the creators of*
*German Idealism.*
*Hegel developed a comprehensive*
*philosophical framework, or*
*"system",*
*of*
*Absolute idealism*



कान्टच्या तत्वज्ञानाला हेगेलने पुढे नवे वळण दिले.कान्टच्या तत्वज्ञानावर टीका केली, पण ती इतकी मूलगामी आहे की ''कान्ट होऊन गेला नसता तर हेगेलचे तत्वज्ञानही उदयास येऊ शकले नसते'', असे म्हंटले जाते.हेगेलच्या विचारांचा प्रभाव जबरदस्त होता, आणि तो प्रभाव केवळ जर्मनीतच पडला नव्हता तर अमेरिकेतील व ग्रेट ब्रिटनमधील विचारवंतांवरही चांगलाच प्रभाव पडला.19 व्या शतकातील तो सर्वात प्रभावी तत्वज्ञ म्हणून गाजला. रसेलच्या मते शुध्द तत्वज्ञानाबाहेरही प्रॉटेस्टंट ईश्वरशास्त्रज्ञांनी हेगेलच्या सिध्दान्ताचा स्वीकार केला, हेगेलच्या इतिहासाविषयींच्या तत्वज्ञानाचा राजकीय सिध्दान्तावर प्रगाढ परिणाम झालेला सापडतो. हेगेलची परमसतची संकल्पना भारतीय चिद्वादास जवळची वाटते. ब्रह्म हीच सर्वगामी अंतिम सत्वस्तू मानणा-या वेदान्तप्रेमी भारतीय तत्वज्ञांना हेगेलचे तत्वज्ञान तर फारच जवळचे व अर्थपूर्ण वाटते, असेही रसेल म्हणतो.19 व्या शतकाच्या शेवटी झालेल्या भारतीय तत्वज्ञांची मते आणि विचार हेगेलच्या सिध्दान्ताने कमालीचे भारले गेलेले होते असे आढळून येते. मार्क्स हेगेलचा विद्यार्थी होता.मार्क्सच्या विचारसरणीवर हेगेलचा खोलवर परिणाम झालेला आहे.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*



## जीवनपट


व्युर्टेम्बर्ग (Württemberg - southwestern Germany) ची राजधानी स्टुटगार्ट येथे 27 ऑगस्ट 1770 रोजी हेगेलचा जन्म झाला. तो शेलिंगपेक्षा पाच वर्षांनी मोठा होता आणि शिलरपेक्षा अकरा वर्षांनी लहान होता. हेगेल मातेच्या प्रेमाला त्याच्या वयाच्या तेराव्या वर्षी मुकला. त्याची आई चांगली शिकलेली व बुध्दिमान असावी. तिच्याविषयी त्याला कमालीची कृतज्ञता वाटत असे. त्याला लुईस नावाचा धाकटा भाऊ होता व त्याने पुढे सैनिकाचा पेशा पत्करला, आणि ख्रिस्तिआनी नावाची बहीण होती. बहीण-भावांत अत्यंत गाढ प्रेमाचे संबंध होते.त्याच्या घरातील वळण खानदानी स्वरुपाचे होते, आणि त्यांच्या वागण्यात प्रामाणिकता, काटकसरीपणा आणि कामसूवृत्ती प्रकर्षाने वसत होती.

त्याच्या शालेय जीवनात त्याच्या ठिकाणी कोणतीही विशेष प्रवृत्ती किंवा कोणताही असामान्य गुण आढळून आला नाही. मात्र कोणताही विषय तो आवडीने व आस्थेने शिकत असे.

## केवल चिद्‌वाद : केवल चित्‌ची संकल्पना आणि स्वरूप

### हेगेलची मूळ संकल्पना -

"अंतिम सत्ता किंवा विश्व हे निरपेक्ष सत्‌ /परम मन/आत्मा आहे आणि कालामध्ये घडणा-या विविध अवस्थांमधून ते जात असते. शेवटी मानवाच्या प्रज्ञेत त्याला स्वत:ची जाणीव होत असते", या विचाराच्या बाबतीत हेगेल, फिश्ट आणि शेलिंग यांच्याशी सहमती होती.तथापि हेगेलचे परमसत्‌ हे कालनिरपेक्ष, शाश्वत, सर्वगामी आणि स्वयंपूरित साकल्यपूर्ण आहे.हेगेल आपल्या द्वंद्वात्मक किंवा द्वंद्वविकासी (Dialectic) तर्कशास्त्राच्या साह्याने, प्रत्येक गोष्ट तत्वत: इतर प्रत्येक गोष्टीशी कशी जोडलेली असते आणि संपूर्ण सत्ता घडण्यास कसे साहाय्य करीत असते हे दाखवितो.




राइट या टीकाकार तत्त्ववेत्त्याच्या मते की हेगेलची युक्तिवाद करण्याची पध्दती देकार्तच्या पध्दतीसारखी एकघाती किंवा रेषानुसारी (Linear) नाही.हेगेलची पध्दती ही आपादनात्मक (Implicative) किंवा व्यंजित करणारी प्रणाली आहे. तिची प्रत्येक अवस्था व बाजू इतर सर्व अवस्था आणि बाजू यांना लक्षित करीत असते. अशा या

प्रणालीमध्ये ज्या असंख्य विविध घटना व घटक वस्तू असतात त्या परस्परावलंबी असतात.ती प्रणाली व्यापक, सर्वगामी, सर्वस्पर्शी व सर्वसमावेशक आहे.तिच्यात कोणतीही संदिग्धता आणि विसंगती न येता ती सर्व त्या समग्र आणि पूर्ण प्रणालीचे सत्य सिध्द करीत असतात.ज्या प्रणालीत सर्व गोष्टींचे सुस्पष्ट आणि सुसंगत रीतीने उपपादन केले जाते ती सत्य असलीच पाहिजे. सत्य हे साकल्य (Whole) असते.यातील प्रत्येक युक्तिवाद प्रत्येक ठिकाणी बुध्दिनिष्ठ असतो. कारण हेगेलच्या मतानुसार "जे सत्य असते ते बुध्दिगम्य असते आणि जे बुध्दिगम्य असते ते सत्य असते " ( *"All that is real is rational; and all that is real is rational.")"*[1] येथे 'सत्य' या संकल्पनेस 'वास्तव' ही संज्ञा सुध्दा उपयोगात आणली जाते.

हेगेलच्या मतानुसार तत्वज्ञानाचे कार्य निसर्गाचे आणि मानवी अनुभवाचे जग जाणण्याचे आहे. तत्वज्ञानाने या जगातील सर्व वस्तूंमध्ये अनुस्यूत असलेली बुध्दी किंवा प्रज्ञा तिच्या वरवरच्या, उथळ, भंगुर आणि यादृच्छिक रुपात नव्हे, तर सारभूत नियमांच्या स्वरुपातील आणि सुसंवादाच्या रीतीने व्यक्त होणा-या रुपात समजून घ्यावयाची असते.या विश्वातील प्रत्येक गोष्टीला आणि घटनेला अर्थ असतो.जगातील सर्व प्रक्रिया बुध्दिगम्य असतात. ग्रहमाला, जिवंत वस्तू व प्राणी बुध्दिशाली असतात, आणि घटनेला अर्थ असतो.

हेगेलच्या दृष्टीने निश्चित सत्ता मानणारा वास्तववाद आणि ज्याचे उद्दिष्टे अस्पष्ट व अनिश्चित असते असा गूढवाद, हे दोन्ही जगाचे पर्याप्त स्पष्टीकरण करु शकत नाहीत. जे खरे सत्यस्वरुप असते ते निश्चित म्हणजे असंदिग्ध आणि सर्वसमावेशक असले पाहिजे. म्हणजे एका बाजूला ते अपूर्ण आणि दुस-या बाजूला संदिग्ध असता कामा नये. जे ख-या अर्थाने संपूर्ण सत्य असेल त्याने या जगातील सुख, दुख: दुरित आणि इतर कोणत्याही लहानमोठया घडणा-या प्रत्येक घटनेचे यथार्थ उपपादन करण्यास समर्थ असले पाहिजे. गूढवादी आणि वास्तववादी यांनी सुचविलेल्या उपयांचे महत्व हेगेलच्या सिध्दांतात कमी होऊ लागते, आणि जीवनांच्या समस्येचे महत्व व अर्थ वाढतो.

## दोन मूलभूत तत्त्वे :

हेगेलच्या सिध्दान्त ज्या दोन मूलभूत तत्वांवर आधारलेला आहे ती अशी :

**(1) जग बुध्दिगम्य (The real is the rational)**

एकतेच्या दृष्टीने जग बुध्दिगम्य समजले पाहिजे. याबाबतीत हेगेल कान्टच्या प्रज्ञेचा आधार घेतो. प्रज्ञेस अतिनैसर्गाचे आकलन होऊ शकत नाही,असे कान्टचे जे मत आहे.त्यापुढे जाऊन हेगले म्हणतो की पण अतिनैसर्गिक (Supernatural) असे काही नसते. जे काही असते ते विचारग्राह्य आणि बुध्दिगम्यच (Rational) असते.

**(2) बुध्दिगम्य जग व्याघातपूर्ण**

बुध्दिगम्य जग प्रामुख्याने व्याघातपूर्ण असते. क्रमविकासाचे तत्व सुसंगतीचे नसून व्याघाताचे असते. आपल्या सर्वसामान्य जीवनात आणि विज्ञानात आपण विचारात तार्किक संगती सांभाळून निष्कर्ष काढत असतो. आपल्या व्यावहारिक जीवनात आपण आपल्या आकांक्षाची पूर्ती करण्यासाठी आणि काही गोष्टींची प्राप्ती करण्यासाठी धडपडत असतो. विज्ञानातही विश्वातील असंख्य आणि विविध प्रकारच्या घटनांचे आपण गणिती सूत्रात रुपांतर करण्याचा प्रयत्न करीत असतो. म्हणजे आपल्या व्यावहारिक उपयुक्ततेच्या क्षेत्रात सुसंगती हे एक

[1]हे विधान वस्तुत: एंगल्सने 1888 साली वापरले होते. या विधानाचे मार्क्सवादी विवरण देताना शासनाची संकुचित मनोवृत्ती स्पष्ट करताना हे विधान एंगल्सने केले होते.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

आवरण असते. सुसंगती आपणांपासून जीवनाचे सत्य स्वरुप झाकून ठेवते. आपल्या प्रत्यक्ष व्यावहारिक जीवनात विसंगती, विरोध, निषेध आणि विषमता या तर नेहमीच भरुन राहिलेल्या असतात, आणि पुन: पुन: निर्माण होत असतात. आणि विचारांचे मूलभूत स्वरुप शोधल्यास त्यात अपरिहार्यपणे विसंगती असल्याचे आपणांस दिसून येते.

विचारात आत्मसंगती असते असे आपण मानतो, कारण सुसंगतीच्या अनुरोधाने व तिच्या पायावर विचार करण्यावरच आकारिक तर्कशास्त्र उभारले गेले आहे. परंतु केवळ सुसंगतीवर आधारलेला विचार हा वास्तव नसतो. विचाराचे स्वरुपच मुळी विसंगतीवर आधारलेले असते, आणि विसंगतीमुळे दुर्लक्ष करुनच सुसंगती प्राप्त करुन घेणे शक्य झाले आहे. त्यासाठी आपण विसंगतीचा नियम (Law of Inconsistencies) कोणता आहे तो समजावून घेणे आवश्यक आहे असे हेगेलला वाटते.



## अंश आणि पूर्ण

हेगेलच्या तत्वज्ञानातील एक मुलभूत संकल्पना पूर्णाच्या त्याच्या भागांशी घडणा-या संबंधाची आहे. पूर्णाच्या (Whole) कोणत्याही भागाचे अस्तित्व आणि स्वरुप त्याच्या पूर्णाशी आणि इतर भागांशी असणा-या संबंधामुळे बनलेले असते.ही गोष्ट प्रामुख्याने जिवंत वस्तूच्या किंवा प्राण्यांच्या शरीराच्या बाबतीत पाहावयास मिळते. जिवंत किंवा सेंद्रिय वस्तूच्या ठिकाणी भाग हे पूर्णाशिवाय आणि पूर्ण भागाशिवाय राहू शकत नाहीत. उदा. शरीराचा एक भाग म्हणून पाय, हात, डोळा, कान, आतडी, श्वासनलिका वगैरे अवयव एखद्या पूर्ण शरीराचे विशिष्ट कार्ये करणारे अवयव म्हणून असतात. शरीराचे भाग म्हणूनच त्यांना कार्ये, अस्तित्व व महत्व असते. शरीरापासून ते अलग झाले तर ताबडतोब त्यांचे कार्य उरत नाही. म्हणजे जिवंत किंवा प्राणमय ऐक्यात पूर्ण (अंशी) आणि त्याचे भाग, अवयव (अंश) यांच्यातील संबंध परस्परावलंबनाचा व परस्परपूरकत्वाचा असतो.

पूर्ण (अंशी) भागाला किंवा अवयवांना (अंशाला) धारण करीत असतो, आणि पूर्ण भागांच्या मार्फत जगत व कार्य करते. म्हणजे ते नसले तर पूर्ण व कार्यक्षम शरीर म्हणून त्यालाही अस्तित्व व जीवन राहू शकणार नाही. याप्रमाणे भाग (अंश) आणि पूर्ण (अंशी) यांच्यात परस्परावलंबनाचा आणि पारस्परिकतेचा संबंध असतो. अशा संबंधांना जिवंत, सेंद्रीय *(Organic) संबंध* म्हणतात. हीच संकल्पना संपूर्ण सत्याला आणि अस्तित्वाचे भाग असणाऱ्या भागांना हेगेल लागू करतो. हेगेलच्या या दृष्टीकोनानुसार विश्वातील प्रत्येक वस्तू आणि प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने इतर सर्व वस्तू आणि घटना यांवर अवलंबून असते. आणि ती तिच्या परीने इतर वस्तूंचे व घटनांचे निर्धारण करण्यास मदत करीत असते. याप्रमाणे सत्याचे किंवा घटनेचे प्रत्येक अंग किंवा बाजू त्याच्या इतर अंगांनी किंवा बाजूंनी मर्यादित आणि निर्धारित होत असते. हेगेलच्या काळापासून ही **सत्याची आणि सत्तेची सेंद्रीय उपपत्ती (Organic Theory of Truth and Reality)** म्हणून ओळखली जाते.


## पार्श्वभूमी

हेगेल फिश्ट आणि शेलिंगच्या कल्पनांच्या पायावर आपल्या तत्वज्ञानाची उभारणी करतो. तार्किक पध्दतीवर भर देण्याच्या बाबतीत हेगेल फिश्टशी सहमत होतो, आणि शेलिंगच्या विचारांची मांडणी बुध्दिवादी आणि वैज्ञानिक पायावर करतो. हेगेल तर्कशास्त्राला सत्ताशास्त्राशी एकरुप करतो. आणि फिश्ट आणि शेंलिंग यांच्याबरोबर अंतिम सत्ता जड व गतिहीन न समजता तिला गतीमान, विकासी व प्राणमय समजतो.

हेगेलच्याही मते निसर्ग आणि मानवी बुध्दी, प्रज्ञा अथवा मन यांना सारत: एकच समजतो. जी प्रक्रिया बुध्दीत किंवा प्रज्ञेत कार्य करते तीच निसर्गात कित्येक ठिकाणी कार्य करते. जे जे वास्तव आणि विद्यमान आहे ते ते सर्व बुध्दिगम्य (Rational) आहे, आणि जे जे बुध्दिगम्य आहे ते सर्व वास्तव आहे, असे हेगेलचे मत आहे.म्हणजे इतिहासाप्रमाणेच निसर्गातही तर्काधारित विचार आहे आणि विश्वाच्या मुळाशी तर्कशुध्द प्रणाली आहे.म्हणजे

शेलिंग समजतो त्याप्रमाणे परमसत्‌ला हेगेल अप्रमेदित (Undifferentiated) अंतिम सत्ता समजत नाही.हेगेल शेलिंगच्या अंतिम सत्तेचे वर्णन करताना ती जणू ‘जिच्यात सर्व गाई काळ्या असतात तशी अंधारी रात्र आहे’ असे उपहासाने म्हणतो.

परमसत्‌ला हेगेल स्पिनोझाप्रमाणे द्रव्यही समजत नाही. उलट हेगेलच्या मते परमसत् हे एक ज्ञातृतत्व (Subject) आहे, आणि ते चिन्मय, प्राणमय, जिवंत प्रक्रिया, विश्वातील सर्व जिवंत घडामोडी या जाणीवविहित विचार करणे (Unconscious thinking) आहे, आणि त्या विचारांचीच दिशा अनुसरत असतात. म्हणून त्याच्या मते निसर्गात जितकी नियमबध्दता असेल तितकी अधिक ती क्रिया बुध्दिशील असते. शेवटी ज्या उध्दिष्टाकडे विकास पावणारे परमसत् वाटचाल करीत आहे ते आत्मबोध किंवा स्वत:ची जाणीव करुन घेणे हे आहे.  म्हणजे विश्वाच्या या विराट प्रक्रियेचा अर्थ त्याच्या परमोच्च विकासात, आणि जे मन विश्वाचे अंतिम प्रयोजन समजते आणि त्याच्याशी एकरुप होते अशा मनाला सत्याचा आणि शिवाचा साक्षात्कार होण्यात, सामावलेला आहे.




## ऐतिहासिक पध्दती

हेगेल तात्विक विवेचनासाठी ज्या पध्दतीचा अवलंब करतो ती *ऐतिहासिक पध्दती* (Historical Method) आहे.  या पध्दतीनुसार कोणतीही गोष्ट, वस्तू किंवा घटना एकेकटी, सुटी, इतरांपासून अलग करुन स्वतंत्र आणि तिचे इतरांशी असलेले दृश्य आणि अदृश्य संबंध लक्षात न घेता समजणार नाही, आणि तिचा अर्थही लागणार नाही.प्रत्येक गोष्टीला स्वत:चे वेगळे वैयक्तिक प्रमाण लावता येणार नाही. प्रत्येक गोष्ट तिच्या सभोवतालच्या सकल परिस्थितीत आणि पर्यावरणात नेमकी कोठे व कशी बसते, तिचे कार्य व स्थान कोणते असते, असे तिचे सर्व संदर्भ लक्षात घेऊन तिचे स्वरुप आणि अर्थ समजावयास पाहिजे.म्हणजे तिच्या सभोवतालच्या संपूर्ण परिस्थितीच्या आणि पार्श्वभूमीच्या संदर्भात तिचे अर्थ आणि महत्व समजावयास पाहिजे. थोडक्यात, कोणतीही गोष्ट व घटना समजवण्यासाठी संपूर्ण सत्तेच्या भूमिकेवरुन तिच्याकडे पाहिले पाहिजे. म्हणजे बुध्दीला बाह्य निकष न समजता आपल्या अनुभवातच ती व्यक्त आणि साकार झालेली असते असे समजावयास पाहिजे.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

## परमसत् (Absolute)

हेगेलने परमसत् किंवा ॲबसोल्यूटची (Absolute) मांडलेली संकल्पना अनन्यसाधारण आहे.हे पमरसत् जगाची निर्मिती होण्यापूर्वी किंवा जग अस्तित्वात येण्यापूर्वी कालामध्ये अस्तित्वात होते आणि त्याने जगाची उत्पत्ती केली किंवा त्यातून जगाचा उदभव झाला असे समजणे बरोबर नाही.परमसत् दिक्कालाच्या चौकटीत अनुक एका ठिकाणी स्थिर अशी वस्तू नसून ते संपूर्ण आणि समग्र अस्तित्वाचे साकल्य आहे.त्यातच जगाचा समावेश असतो.ते पूर्ण, सकल, समग्र, सर्वस्पर्शी असून त्याची स्वत:ची जाणीव (Self-consciousness) मानवी मन आणि मानवी जाणिव या रूपात व्यक्त झालेली आहे.

या परमसत्चे विराट स्वरुप हेगेल व्यक्त करतो. या सत् आणि मानवाचा संपूर्ण घनिष्ठ आणि सेंद्रीय संबंध असतो. साहजिकच मानवी विचारांचे किंवा प्रज्ञेचे नियम हेच भौतिक विश्वाचे म्हणजे निसर्गाचेही नियम आहेत.मानवी जाणीव व निसर्ग या दोघांचे आंतरिक सारतत्व एकच आहे, पण बाह्य आविष्कृत रुपे भिन्न आहेत.याच अर्थाने ''जे वास्तव किंवा सत्य असते जे बुध्दिगम्य असते (The real is the rational) आणि जे बुध्दिगम्य असते ते वास्तव किंवा सत्य असते (The rational is the real)'' असे हेगेल म्हणतो.

## विरोधविकास / द्वंद्वविकास-पध्दती (Dialectical Method)

हेगेलच्या मते विरोध (Contradiction) हा सर्व जीवनाच्या आणि गतीच्या मुळाशी असतो, आणि विरोधाचे तत्व जगाचे नियंत्रण करीत असते.प्रत्येक गोष्ट बदलत असते आणि आपल्याविरुध्द गोष्टीत परिवर्तित होत असते. उदा. बीमध्ये वेगळे होण्याची उपजत प्रवृत्ती असते. म्हणजे स्वत:च्याविरुध्द काहीतरी करण्याची आणि त्याच्या पलीकडे जाण्याची तिच्यात प्रवृत्ती असते. जर विरोध नसला तर जीवन, गती, वाढ, विकास ही असूच शकणार नाहीत, आणि विरोधाचा अस्त झाला तर विश्वातील गोष्टी बाहेरुन निर्जीव, निष्प्राण आणि गतिविरहित होऊन जातील.

दोन गोष्टी आणि गुणधर्म यांच्यात विरोध असतो हे खरे, पण तो विरोध द्वंद्व ठरतो, आणि त्या दोघांपेक्षा व्यापक अशा एकतेत तो विरोध विराम पावतो. दोन परस्परविरोधी गोष्टी किंवा गुणधर्म परस्परांच्या संदर्भात विरुध्द असतात, परंतु हे दोघेही त्यांना सामावून घेणा-या व्यापक एकतेचे भाग असतात. त्या एकतेच्या भूमिकेवरुन त्यांच्याकडे पाहिल्यास उच्च पातळीवर त्यांचा समन्वय आणि ऐक्य होते. आणि विरोध, विसंगती, वैर आणि संघर्ष नष्ट होतो. विरोधी जोडीपैकी प्रत्येक घटना किंवा गोष्ट सुटी, विलग आणि एकटी घेतली तर त्यापैकी कोणालाच अर्थ व महत्व राहात नाही. पण विरुध्द भाग आणि गुण त्याच्याहून मोठया आणि व्यापक योजनेचे भाग म्हणून जर त्यांच्याकडे पाहिले तर पूर्णाच्या समग्र योजनेत त्यांचे नेमके स्थान आणि कार्य कोणते हे ठरते, आणि त्यांचे वैशिष्टय आणि महत्वही स्पष्ट होते.

कान्टच्या मते तत्वज्ञान हे संकल्पनात्मक ज्ञान असते.परंतु हेगेल ते मत नाकारतो.त्याच्या मते सर्वच सत्तेचे संकल्पनेच्या साहाय्याने आकलन होऊ शकत नाही. हेगेलच्या मते परमसत् किंवा सत्ता जिवंत आणि गतीमान प्रक्रिया असते, चैतन्याने सळसळणारी आणि प्रतिक्षणी अनेक,विविध, बदलत्या रुपांनी व्यक्त होत असते. ती अमूर्त, स्थिर आणि जड संकल्पना यात व्यक्त होवू शकत नाहीत. स्थिर, मर्यादित, जड आणि अमूर्त संकल्पना विराट, प्रतिक्षणी बदलणा-या आणि दुर्दम्य चैतन्याने खळाळून आविष्कार करणा-या सत्तेचे फारच अल्प आणि मर्यादित भागाचे आपणांस दर्शन घडवू शकतात.

हेगेल म्हणतो की हे विश्व किंवा सत्ता इतकी गतिमान, आणि प्रतिक्षणी नवनवीन रुप धारण करीत असते की आता ती एका प्रकारे दिसते, तर दुस-या क्षणी तिचे वेगळेच रुप प्रत्यायास येते. म्हणजे आता सत्तेचे जे रुप असते ते

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

---

पुढच्या क्षणी तसेच न राहाता वेगळेच बनते. म्हणजे भावाचा अभाव बनतो आणि उलटही घडते. एकाच वेळी विरोधी असणे, विसंगती येणे हेच सत्तेचे स्वरुप असते. सत्ता कधीच सातत्याने एकाच रुपाने टिकून राहात नाही. बदलणे, वाढणे, परिपक्व होणे, जीर्ण होणे, -हास आणि अंत होणे हा जगातील सर्व वस्तूंचा जीवनक्रम असतो. बी उगवणे, रोप होणे, रोपाचे झाड होणे, ते पानाफुलांनी बहरणे, डवरणे, प्रौढ आणि सुदृढ होणे, त्याला फळे येणे, परिपक्वता येणे आणि कालाच्या प्रवाहात क्षीण व जीर्ण होणे, हळूहळू वठणे, त्यातील जीवनरस आटणे, ते सुकणे आणि हळूहळू मरणे किंवा त्याचा अंत होणे हा निसर्गाचा न टाळता येणारा क्रम असतो.

माणसाच्या बाबतीत मूल जन्माला येते, भ्रूणावस्था, अर्भकावस्था, बाल्यावस्था, किशोरावस्था, यौवनावस्था, प्रौढावस्था, जरा, वार्धक्य आणि मरण या सर्व अवस्थांतून प्रत्येक जिवंत मानवी व्यक्तीला जावेच लागते. या विकासक्रमात आधीची अवस्था संपुष्टात आल्याशिवाय नंतरच्या अवस्थेचा उदय होत नाही. आधीचे स्वरुप संपते, नष्ट होते आणि नंतरचे रुप दिसते, वृध्दिंगत होते आणि पूर्णपणे विकसते.

जगात असे काहीही नसते की ज्याला दुसरी बाजू आणि विरोधी असे काहीही नसते. हे जग द्वंद्वानेच बनलेले असते. भेद, द्वंद्वे, विरोध हे या जगाच्या किंवा विश्वाच्या रचनेत किंवा घडणीत मुळातच असतात, आणि त्यांच्या परस्परविरोधी क्रियांतून आणि संघर्षातूनच जगाचे व निसर्गाचे व्यवहार घडत असतात. विरोध असले तरी ते एकमेकांना साहाय्यक, पूरक, पोषक, उत्तेजक आणि विकासाला अपरिहार्य असतात.म्हणून कोणत्याही लहान किंवा मोठया गोष्टीला न्याय देण्यासाठी, म्हणजे तिचे यथार्थ स्वरुप समजण्यासाठी तिचे संपूर्ण जीवन किंवा अस्तित्व म्हणतो त्यात तिच्या सर्व परसपरविरोधी गुणांचा कसा समन्वय झालेला असतो, आणि ते सर्व गुण कसे सांभाळलेले असतात हे दाखवायला पाहिजे.सर्वसामान्य अमूर्त विचार वस्तूंचा अलग आणि स्वतंत्र विचार करीत असतो, तो सुटया आणि अलग वस्तूंना आणि घटनांना सत्य मानत असतो, आणि तिच्या विविध गुणांचा आणि विरोधांचा वेगवेगळा विचार करीत असतो. परंतु प्रत्येकाचा अलग, सुटा आणि स्वतंत्र विचार करण्याने सत्य मिळू शकत नाही.

याप्रमाणे विचार अत्यंत अमिश्र किंवा निरमय (Simple), अमूर्त आणि आशयविरहित (रिक्त) संकल्पनांपासून अधिक संमिश्र, मूर्त आणि समृध्द अशा परिकल्पना (Notions) होण्याकडे प्रगती करतात. ही विचारपध्दती आधीच कान्टने सूचित केली होती. आणि फिश्ट आणि शेलिंग यांनी तिचा अवलंब केला होता. तिला हेगेल द्वंद्वपध्दती किंवा द्वंद्वविकास (Dialectical) पध्दती म्हणतो.पहिल्याच्या विरोधातून दुसरा, दुस~ यास विरोध म्हणून तिसरा, असे सतत घडते. म्हणून यास ***विरोधविकास पध्दती*** असेही नाव आहे.

हेगेलच्या मते द्वंद्वविकास म्हणजे,

*(1) ज्या गुणधर्मामुळे एक विचार अनिवार्यपणे दुस-या विचारात प्रवेश करतो असा विचाराचा गुणधर्म*

*(2) ज्या गुणधर्मामुळे प्रत्येक विशिष्ट वस्तू अनिवार्यपणे दुस-या वस्तूंशी संबंधित असते असा गुणधर्म*


-- असतो.म्हणून त्याच्या मते ज्या रीतीने विचार सत्याला जाऊन भिडतो ती रीतसुध्दा अस्तित्वाच्या (Dasein) आंतरमय जीवनाचे अव्यवहित आविष्कारण असते.म्हणजेच जेव्हा आपण अस्तित्वाचा विचार करीत असतो तो तेव्हा अस्तित्वच आपल्यामध्ये विचार करीत असते.

हेगेलचे हे पुरोगामी द्वंद्वविकासी तत्त्व अस्तित्वाच्या किंवा सत्तेच्या (Desein) स्वयंविकासाचा आविष्कार आहे. अस्तित्वाची ही नाडी विश्वातील प्रत्येक वस्तूत, घटनेत तशीच आपल्याही विचारांत थडथडत असते.म्हणजे विश्वात सर्वत्र भरुन राहणारी आणि कार्य करणारी ही तालबध्दता जशी निसर्गातील वस्तूंमध्ये, वनस्पती,नद्या,समुद्र,मेघ, जलचर, प्राणी, आणि इतर असंख्य प्रतिक्षणी घडणा-या घटना यांच्यात अप्रतिहतपणे कार्य करीत असते तशीच ती मानवाचे विकार, भाव, भावना, कल्पना, विचार, संकल्पशक्ती कृती या सर्वांमधूनही कार्य करीत असते.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

## तीन अवस्था / त्रिस्तरिय अवस्था

द्वंद्वविकासाची प्रक्रिया तीन अवस्थांतून व्यक्त होत असते. त्या पक्ष (Thesis), प्रतिपक्ष (Antithesis) आणि समन्वय, संपक्ष (Synthesis) या शब्दांतून व्यक्त केल्या जातात. म्हणजे मुळात एक बाजू किंवा गूणधर्म असतो, त्याल अतिरेकी महत्व येते आणि म्हणून त्याला तितकीच जोरदार विरोधी प्रतिक्रिया निर्माण होते, किंवा विरुध्द गुणधर्म व्यक्त होतो त्या दोघांमध्ये अतिरेकीपणा आणि एकांगीपणा निर्माण होऊन त्यांच्यातील सत्यता मर्यादित होते, कमी पडते. परंतु त्यांच्यात अंतर्भूत असणारे सत्य समजण्यासाठी त्यांचे एकांगी स्वरुप सोडून देऊन, पण त्यांचे वैशिष्टय व महत्व मान्य करुन त्या दोघांना योग्य ते महत्व आणि स्थान देऊन त्या दोघांना ज्या एका व्यापक संकल्पनेत अंतर्भाव किंवा समावेश करता येईल आणि त्यांच्यात ऐक्य घडविता येईल त्याला हेगेल संश्लेषण (Synthesis) म्हणतो.




कोणतीही विशिष्ट, कल्पना किंवा गुणधर्म याला सत्यता असते, पण प्रत्येक अलग संकल्पना घेतली तर ती एकटी, एकांगी व सदोष ठरते, आणि ती सत्याची मर्यादित बाजूच व्यक्त करीत असल्याने तिला पूर्णता येण्यासाठी तिच्या विरुध्द असलेल्या संकल्पनेची जोड आणि पुष्टी द्यावी लागते. म्हणजे कोणत्याही संकल्पनेला तिच्याविरुध्द संकल्पनेची जर जोड दिली तर त्या विरुध्द असल्यातरी परस्परांना पूरक (Complementary) बनतात, आणि त्या दोघींच्या संश्लेषणातून त्यांचा समावेश करणारी आणि त्यांना धारण करणारी अशी एक तिसरी त्या दोघींपेक्षा व्यापक, श्रेष्ठ, आणि, समृध्द संकल्पना तयार होते. आणि अशा तिस-या संकल्पनेत अधिक व्यापक व अधिक पूर्ण सत्य असते.

अर्थात् ही पक्ष, प्रतिपक्ष आणि समन्वय यांची त्रयी जिवंत आणि गतिमान सत्तेच्या लयबध्द विकासाच्या गतीच्या अवस्था आणि त्यांची विकासप्रक्रिया दाखवितात. पण ही त्रयी किंवा त्रिधागती अशीच न संपता सतत चालू राहते, आणि तिला कधीही अंत येत नाही, आणि त्रयी पूर्णता गाठली जात नाही.द्वंद्वाशिवाय आणि विरोधाशिवाय तिच्यातील गतिमानता आणि विकासशीलता टिकूच शकत नाही. जिवंत आणि गतिमान राहण्यासाठी तिच्यामध्ये अनुस्युत असणारे विरोध, व्याघात, विसंगती ही सर्व अखंडितपणे तशीच चालू राहावयास पाहिजेत. तिची पूर्तता आणि परिसीमा भेदविरहित एकता प्राप्त होण्यानेच होऊ शकते. पण अशा प्रकारची एकता निष्प्राण, रिक्त आणि चैतन्यविहीन होण्याची भीती आहे.

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

द्वंद्वविकास पध्दतीचा असा नियम आहे की एका संकल्पनेच्या किंवा गुणाच्या गर्भातच तिच्या विरुध्द संकल्पनेचे किंवा गुणाचे बीज असते, आणि पक्षाच्या अंतरंगातच प्रतिपक्षाची उत्पत्ती आणि वाढ होत असते. कोणत्याही संकल्पनेला होणारा विरोध बाहेरुन न होता तो तिच्याच गर्भातून प्रसवत असतो. आणि पक्ष आणि प्रतिपक्ष या दोघांच्याही भूमिका अतिरेकी आणि एकांगी होत असल्याने त्या दोन्ही असत्यास जन्म देतात, आणि म्हणून त्याचे संश्लेषण किंवा समन्वय (Synthesis) होणे हाही त्यांच्याच अंगभूत नियम असतो. पक्ष आणि प्रतिपक्ष यांच्यातील अतिरेकी भागाचा निरास केल्यावर शिल्लक राहणा-या सारयुक्त भागांचे संमिश्रण होऊन तयार होणा-या तिस~ या संकल्पनेस किंवा वस्तूस समन्वय किंवा संपक्ष (Synthesis) म्हणता येईल. पण समन्वय होताना दोन विरोधी संकल्पनामधील सारयुक्त, जगण्यासारखा आणि टिकून राहण्यास योग्य (Worth conservation) असा जो भाग असतो आणि जो भावी विकासप्रक्रिया चालू राहाण्यास साहाय्यक, पोषक आणि उत्तेजक म्हणून आवशयक असतो त्याचा नाश न होता तो टिकून राहातो. पण आधीच्या अवस्थेचा नाश झाल्याशिवाय त्याची पुढील प्रगत अवस्था जन्म घेत नाही.

## व्याघाताला (Contradiction) महत्व

हेगेलच्या विचारप्रणालीत आणि मुख्यत: द्वंद्वविकासाच्या संकल्पनेत विरोधाला किंवा व्याघाताला (Contradiction) खूपच महत्व मिळालेले आहे. संकल्पनेत अव्यक्त रुपाने वसणारा व्याघात किंवा विरोध जेव्हा त्या संकल्पनेतील दृढता (Rigidity) आणि स्वयंपूर्णता (Self-containedness) नाहीशी होऊ ती तिच्या विरोधी संकल्पनेत प्रवेश करते तेव्हा नाहीशी होतो.त्याप्रमाणे हेगेलच्या विचारात व्याघाताला अगदी आनुषंगिक आणि किरकोळ महत्व न राहाता व्याघाताचा उदगम हा त्याच्या द्वंद्वात्मक गतीला प्रेरक ठरतो. परस्पर विरोधी संकल्पनांमधील नित्य संघर्ष आणि त्या संघर्षाची समन्वयात होणारी परिणती ही तिच्यापुढील संघर्षाची जननी ठरते, आणि ही संघर्षगर्भ द्वंद्वविकासी प्रवृत्ती मनाला सतत अधिकाधिक व्यापक आणि समावेशक, आणि शेवटी सर्वव्यापी सत्याला जाऊन पोहोचण्याचे असते. ही प्रक्रिया इतिहास घडविणारी अशी एक प्रेरकशक्ती आहे, तिच्या अनुरोधाने इतिहासाची प्रदीर्घ मालिका अर्थपूर्ण आणि बुध्दिगम्य बनते असे कॉपल्स्टनला वाटते.

## मानसघटनाशास्त्र / मानस-तत्वज्ञान : आत्मतत्वज्ञान

## (Philosophy of mind : Philosophy of Spirit)

हेगेलच्या तत्वज्ञानाचे वैशिष्ट्य अखंडित एकतेत सामावलेले आहे. त्याच्या दृष्टीने संपूर्ण अस्तित्व मग जड, भौतिक, बाह्य असो की जाणिवेच्या अवस्थांनी बनलेले मानसिक असो ती सर्व एकाच अंतिम सत्तेची, एकाच परम निरपेक्ष सत्ची विविध प्रकारची व्यक्त किंवा प्रकट रुपे आहेत.काहींमध्ये आपणांस पाषाणातील अभेद्य जडता दिसते तर काहीमध्ये पारदर्शक वैचारिक आणि भावनिक तरल संवेदनशीलता दिसते.मुळात आणि साराच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास सर्वच अस्तित्वाचा गाभा एकच परमसत् आहे, आणि त्यालाच हेगेलने ***निरपेक्ष सत्*** किंवा ***परमसत्*** म्हटले आहे.

या विवेकशील आयडियाने स्वत:होऊनच बाह्य स्वीकारुन दृश्य संवेद्यरुपे धारण केली किंवा पांघरली आहेत. दिक् आणि काल यांची आभरणे परिधान करुन ती आपणांस मूर्त भौतिक वस्तूंच्या आणि घटनांच्या रुपाने प्रतीत होते. खरे म्हणजे निसर्गातील असंख्य मूर्त व संवेद्य रुपात जे आकार, संघटितता, परस्परसंबंध यांसारख्या गोष्टी असतात त्यांचा अर्थ विचारांच्या रुपांचा असतो.वस्तूंचे आकार रुपे, गुणधर्म, परस्पर क्रिया-प्रतिक्रिया, क्षमता यांचे आकलन केवळ विचाराला किंवा बुध्दीलाच होत असते, म्हणून निसर्ग ही बुध्दी किंवा विवेकशीलता असते, असे हेगेल म्हणतो.

निसर्गाचे जे दृश्य जड, मूर्त आणि भौतिक रुप दिसते ते सारत: सांकल्पनिकच असते, कारण नैसर्गिक वस्तमू आणि घटना ही सर्व संकल्पनांची मूर्त, शरीरधारी व्यक्त संवेद्यरुपे असतात. म्हणून बाह्यता (Externality) ही स्वयंवर्ती, स्वयंपूर्ण किंवा संपूर्णत: स्वयमाधारित नसते, तर तिचा अर्थ तिच्या आनुषंगिक कल्पनेच्या आधाराने बुध्दीनेच समजावयाचा असतो. म्हणून निसर्गातील मूर्त भौतिक वस्तूंना आणि घटनांना हेगल धनीभूत, जडीभूत जाणीवविरहित बुध्दी असे म्हणतो.म्हणजे निसर्गातील मूर्त भौतिक वस्तूत आणि घटनात विचार, संकल्पना आणि बुध्दी सुप्त असतात.म्हणजे निसर्गातील जड भौतिक वस्तूत आणि घटनात विचार संकल्पना आणि बुध्दी या जणू अल्पकाळ निद्रितावस्था धारण करुन वेगळया रीतीने कार्य करीत असते. याप्रमाणे किंवा साक्षात्कार करुन घेत असते अंतिम अवस्थेत ती मनाचे आणि आत्म्याचे रुप धारण करीत असते. याप्रमाणे अथपासून इतिपर्यंत एकाच सत्तेचे अखंडित, एकसंघ जीवन असते, आणि अंतामध्ये आदीला स्वत:चा साक्षात्कार होतो किंवा आत्मप्रतीती होते, आणि आदिमधूनच पूर्ण रुप विकसित होते. अंतिम पूर्ण रुपाची प्रतीती होण्यामध्ये बाहेरुन काहीच येत नाही. जे अव्यक्त आणि अप्रकट असते तेच व्यक्त आणि प्रकटरुप धारण करते, आणि सर्व एकच एक असते, मात्र एकतेची ही अनुभूती एका विराट आणि प्रदीर्घ चक्रातून मूर्तिमंत होते.

## आत्मतत्व (Geist)

"आत्मा" किंवा "आत्मतत्व" या अर्थी जर्मन भाषेत *der Geist* हा शब्द आहे. त्याचे स्वैर भाषान्तर 'मन' (mind) असेही केलेले सापडते. परम किंवा निरपेक्ष आयडिया हा आत्मतत्वाचा किंवा मनाचा अभिकल्प असतो. हेगेलच्या तर्कशास्त्रात जगाची उत्पत्ती होण्यापूर्वी जे परम मानस किंवा आदि बुध्दी होती, किंवा ईश्वराने स्वत:चे प्रकटीकरण करण्यापूर्वी तो जसा होता त्याचे वर्णन केलेले सापडते. परंतु हे परम-मानस पूर्णपणे अमूर्त रुपात होते. आता असे मन अस्तित्वातच नाही. असे अविष्कार न झालेले किंवा व्यक्त न झालेले मन प्रत्यक्ष कोठेही पाहावयास मिळत नाही, आणि पाहावयास मिळणेही शक्य नाही. हे मूळ अमूर्त किंवा अप्रकट मानस त्याच्या विरुध्द असे जड, विचारविहीन भौतिक रुप घेते, आणि स्वत:ची आंतरिकता सोडून बाह्यता पत्करते, आत्मतत्वज्ञानामध्ये मूळ परमसत् स्वत:मध्ये पुनरागमन करते.

जे जड, भौतिक, जाणीवविरहित झालेले होते ते पुन्हा स्वयंवेद्य मानस किंवा आत्मरुप बनते. परंतु त्याचे हे नंतरचे रुप अमूर्त नसून मूर्त बनते, आणि ते मानवाच्या जिवंत मनाच्या आणि आत्म्याच्या क्रियांच्या रुपांनी पाहावयास मिळते. मूळ मानस किंवा आदि बुध्दी व्यक्त रुपात मानवाच्या व्यावहारिक आणि सामाजिक जीवनात व्यक्त रुपात पाहावयास मिळते.

## आत्मतत्व ज्ञानाचे तीन मुख्य विभाग

आत्मतत्वज्ञानाचे तीन मुख्य विभाग आहेत. पहिल्या दोन विभागांत मानवाच्या मर्यादित जीवात्म्याचा विचार केलेला आहे, आणि तिस-या भागात निरपेक्ष किंवा परम आत्म्याचा किंवा लोगोसचा (logos) आत्मचिंतन करणा-या विचाराच्या मूर्त रुपात विचार केलेला आहे.

आत्मतत्वज्ञानाचा पहिला भाग व्यक्तिनिष्ठ आत्मतत्वाचा (Subjective Spirit) व मानववंशशास्त्राचा आहे.आपल्या द्वंद्वविकासी योजनेप्रमाणे हेगेलने त्याचे तीन उपविभाग केले आहेत.

1. **मानववंश विज्ञान (Anthropology)**

इन्द्रिय संवेदन करणा-या (Sensing) आणि भावभावना अनुभवून आत्मतत्वाकडे संक्रमण करणाऱ्या प्रक्रियेतील जोडबिंदु आहे.एका बाजूला हा जीवात्म्यास आत्मानुभव *(Self-feeling : Selbstgefuhl)* देत असतो. ही शुध्द केवळ स्वत:च्या अस्तित्वाची जाणीत असते.मानवाचा जीवात्मा हा अमूर्त रुपात नसतो, त्याला बाह्य शरीरी रुप

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

असते. म्हणजे तो शरीरपरिवेष्टित बोधशील तत्व या रूपात असतो. त्याला मनाचे अंतरंग आणि शरीराचे बाह्यांग असते. यात मानवाच्या इंद्रिय वेदन-संवेदन, तृष्णा, इच्छा, प्रज्ञा, कल्पनाशक्ती, स्मृती इत्यादी गोष्टींचा विचार आढळतो. अशा त-हेचे आत्मतत्व स्वरुपावस्थेतील असते.

### 2. वस्तुगत आत्मतत्व (Objective Spirit)

आत्मतत्व स्वत:मधून बाहेर जाते आणि इतरत्व रूप (निसर्गरुप) धारण करते.स्वत:ला ते विश्वात परिवर्तीत करते.साहजिकच जाणीवयुक्त मनाचा विषय बनते.हे वस्तुगत आत्मतत्व (Objective Spirit) बनते.आत्म्याचे विषयित्व आणि सारभूत आंतरिकता स्वत:चे रुप सोडून जड भौतिक वस्तूंचे रुप किंवा वस्तुगतता (Objectivity) धारण करते.



अर्थात ज्या जगाची निर्मिती करते ते जग पाषाणांचे जड संवेदनाशून्य जग नसून आध्यात्मिक (Spiritual) जग असते. हे जग प्रामुख्याने विधिसंस्था (कायदा Law ), नीतिसंस्था (Morality), आणि शासनसंस्था यांचा समावेश असतो. या संस्था मानवी मनाच्या बाहेर असतात. पण मानवी मनानेच घडविलेल्याही असतात. या संस्था मानवाच्या आत्म्याचे विषयीकरण (Objejctification)असते. मात्र त्या कोणाही एका व्यक्तीच्या व्यक्तिगत इच्छा, कल्पना, लहरीपणा किंवा विक्षिप्तपणाचे विषयीकरण किंवा बाह्यीकरण नसते.उलट त्यांच्यामध्ये सर्वांना समान असणा-या मानवतेच्या इच्छा, कल्पना, आकांशा आणि आदर्श मूर्त ही झालेली असतात.ती सार्वदेशिक असतात.

येथे हेगेल अशी अपेक्षा करतो की ही निर्मिती काही थोडक्या विशिष्ट व्यक्तींच्या किंवा गटांच्या वैयक्तिक इच्छांचे, त्यांच्या लहरींचे, दूषितग्रहांचे, किंवा एकांगी आणि स्वार्थी इच्छाचे व्यक्तीकरण न होता त्यांच्या स्वार्थाच्या पलीकडे आणि सर्वोच्या हितास अनुकूल आणि पोषक अशा प्रवृत्तीचे आविष्करण व्हावयास पाहिजे.या सामाजिक , राजकीय इ.संस्था कोणत्याही समाजाच्या विवेकाधारित असलऱ्या तरच समाजाचे त्यांच्यात प्रतिबिंब पडते. तेंव्हाच ते संपूर्ण समाजाच्या प्रातिनिधिक ठरतील.म्हणजे या संस्था विशिष्ट व्यक्तींच्या मनाच्या बाहेर असून त्यांना व्यक्तिनिरपेक्ष आस्तित्व असते, म्हणून त्यांना वस्तुगत (Objective) म्हणण्यात येते.

पण त्याचबरोबर त्यांची निर्मिती मानवाच्या मनातून, त्याच्या इच्छा-आकांक्षा-आदर्शातून होत असल्याने त्यांचे स्वरुप मानसिक आणि आध्यात्मिक (Spiritual) असते. त्यांच्यात मानवाचे हेतू, उध्दिष्टे आणि आदर्श प्रकट होत असतात. या भागात हेगेल त्याच्या नीतिविषयक आणि राजकीय तत्वज्ञानविषयक कल्पना विशद करुन सांगतो.या विभागात हेगेल *'जाणिवेच्या अनुभव प्रपंच-शास्त्राकडे'* *(Phenomenology of Consciousness)* जातो.मानव-विज्ञानाच्या पातळीवरील आत्मा त्याच्या मते एकतेच्या आणि सर्वात खालच्या पातळीवरील व्यक्तिगत आत्मा असतो, आणि त्याच्याविरुध्द त्याच्या बाहेर असलेले भौतिक जड जग असते. परंतु या दुस-या पातळीवर मानवाचा आत्मा त्याच्या मर्यादांतून बाहेर पडून आपल्यासारख्या इतर जीवात्म्याचे अस्तित्व आणि जीवन मान्य करतो आणि व्यक्तीच्या संकुचित आत्मा केवळ स्वत:पुरता न राहता त्यापेक्षा उच्च भूमिकेवर तो इतर आत्म्यांशी समरस होऊन उच्च पातळीवर सार्वदेशीय आत्मतत्वाचा व्यापक अनुभव घेतो.

### 3. निरपेक्ष सत् / परम आत्मतत्व (Absolute Reality)

मानवी आत्मा कला, धर्म आणि तत्वज्ञान यांच्यात आपली अभिव्यक्ती करतो. तो अखेरिस सौदर्यशास्त्र, धर्माचे तत्वज्ञान आणि तत्वज्ञानाचे तंत्रज्ञान यात आविष्कृत होतो. हे निरपेक्ष सत् होय. येथे मूळ आत्मतत्व व्यक्तिगत आत्मा आणि वस्तुगत आत्मा यांचे ऐक्य व्यक्त करतो. यात पातळीवर आत्मतत्व संपूर्णपणे मुक्त होते, आणि पातळी अनंतता आणि नि:शेषता यांचा प्रत्यक्ष अनुभव येतो. यात विषय आणि विषयी, ज्ञेय आणि ज्ञाता हे एकरुप किंवा अभिन्न बनतात.म्हणजेच ' असे चेतनावादी तत्वज्ञान व्यक्तिनिष्ठता आणि वस्तुनिष्ठता यांचे संपूर्ण' ऐक्य ठरते.तत्वज्ञानामध्ये आयडियामध्ये स्वत:मधील पुनरागमनाची पूर्णता होते. येथे बाहेर गेलेला आत्मा स्वत:विषयीचेच भान विकसित करून आत्मज्ञानाने युक्त होवून विराजित होतो.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

असे हे आत्मतत्वचिंतन ही हेगेलचया मते या जगात प्रज्ञेची किंवा आयडियाची सर्वश्रेष्ठ अभिव्यक्ती ठरते. या अवस्थेत ज्ञाता आणि भौतिक जड सृष्टी यांच्यामधील द्वैत लय पावते आणि त्या दोघांच्या मूलभूत आंतरिक एकतेचा व्यापक अनूभव तत्वज्ञानाला येतो.

हेगेल जीवात्म्याचा किंवा सान्त मनाचा सैध्दान्तिक आणि व्यावहारिक दृष्टींनी विचार करतो. सैध्दान्तिक दृष्टीचा तो जेव्हा विचार करतो तेव्हा त्यात तो अन्तर्ज्ञान, स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती आणि विचारशक्ती यांचा विचार करतो. जेव्हा तो व्यावहारिक बाजूचा विचार करतो तेव्हा भाव, आवेग आणि संकल्प यांचा विचार करतो.

त्याचा निष्कर्ष असा आहे की आपली प्रत्यक्ष संकल्पशक्ती ही सैध्दान्तिक आणि व्यावहारिक आत्म्यांचे संयोजन असते.स्वतंत्र किंवा मुक्त संकल्पशक्ती स्वत:साठी आणि स्वत:होऊन मुक्त राहात असते. आत्मतत्वाची संकल्पना ही विवेकी संकल्पशक्तीची संकल्पना असते असे हेगेलचे मत आहे.

---

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner